# नगर परिषद वाशिम जि. वाशिम
## MUNICIPAL COUNCIL WASHIM DIST. WASHIM
दुरध्वनी क्र. 07252 –232131 टोल फ्री क्र. – 1800 233 3127

ईमेल - coud.washim@maharashtra.gov.in वेब साईट - www.washimmahaulb.maharashtra.gov.in

ईमेल - mcwashim@gmail.com वेब साईट - www.washimmc.in


नपवा/नियो/ कार्या-14/ बा.प./जा.क्र./ 2227 /2021 दिनांक :- 1 /10 /2021

परिशिष्ट –ड

**( उपविधि नियम नं. 10-1)**

**सुधारीत बांधकाम परवाना**

प्रेषक

नियोजन प्राधिकरण

वाशिम नगर परिषद, वाशिम

**प्रति,**

**श्री.मोहन नारायणदास वनजाणी व इतर-8**

**रा.वाशिम**

**विषय :-** मौजे वाशिम येथील सर्व्हे नं. 323/1 व 324/1 मधील भुखंड क्र.1 वरील बांधकाम परवानगी मिळणे बाबत.

**संदर्भ :-** आपला अर्ज क्र. 636/2021 दिनांक 02.03.2021 रोजीचा विनंती अर्ज

आपणांस कळविण्यात येते की, आपले बांधकाम प्रकरण दि. 02.03.2021 च्या अर्जातील संदर्भ नूसार मौजे वाशिम येथील सर्व्हे नं. 323/1 व 324/1 मधील भुखंड क्र.1 वर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 45 अन्वये खालील अटीस अनूसरुन अधिन राहून प्रस्तावित बांधकामाला मंजूरी देण्यात येत आहे.

1) बांधकाम मंजूरी आदेश प्राप्त झाल्याचे तारखे पासून सदर मंजूरी एका वर्षा पर्यंत वैध राहील.
2) बांधकाम परवानगी केवळ **व्यवसाईक,इमारतीचे विद्यमान बेसमेंट,तळ मजला,आणि प्रस्तावित पहिला मजला** करिता आहे.
3) सुधारीत बांधकाम नकाशाला परवानगी देण्यात येत आहे.
4) नकाशात दुरुस्ती केल्या प्रमाणे बांधकाम करावे लागेल.
5) बांधकामात कोणत्याही प्रकारची फेरफार मुख्याधिकारी यांची पूर्व परवानगी शिवाय करेता कामा नये.
6) बांधकाम चालू केल्याचा व पूर्ण झाल्याचा वेगवेगळा अहवाल नगर परिषदेस देणे बंधनकारक राहील.
7) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या कार्यालयाकडून वापर प्रमाणपत्र प्राप्त करावे .
8) ईमारत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मुख्याधिकारी यांचा वापर प्रमाणपत्र मिळाल्या शिवाय ईमारत वापर सुरु करण्यात येवू नये .
9) जागेच्या मालकी हक्का बाबत अथवा जागेच्या हद्दी बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील.
10) रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र नगर परिषदेकडे नोंदणीकृत बक्षीसपत्राद्वारे विनामुल्य हस्तांतरीत करुन देणे बंधंनकारक राहील.
11) सांडपाणी व्यवस्थापनासाठी शुध्दीकरण पध्दतीने पुर्नवापर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र युनिट तयार करुन स्वयंपाकघरातील व न्हाणीघरा मधील पाण्याचा पूर्नवापर करणे बंधनकारक आहे.
12) महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील ठेवण्यसाठी कचरा ( नियंत्रण ) अध्यादेश ,2006 नूसार टाकावे. पदार्थ गोळा करण्यासाठी /आपल्या जागेत साठवून देवण्यासाठी दोन स्वतंत्र कचरा कुडया ( हिरव्या व पांढ-या रंगाच्या ) ठेवून ओला कचरा व सुका कचरा ठेवण्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल.
13) सदर ईमारती मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनिमय, 2006 नूसार आवश्यक ती आग प्रतिबंधक उपायोजना करण्यात यावी .
14) प्रस्तावित बांधकाम हे भुकंप प्रतिरोधक असल्याची खात्री करुन घ्यावी व भुकंपा पासून हानी होवू नये म्हणून ईमारतीच्या स्थैर्याबाबत ईमारतीचे R.C.C.डिझाईन सक्षम वास्तू विशारद यांचे कडून करुन घ्यावे.

..2..

15) प्रस्तावित बांधकामाच्या जागेमध्ये पावसाळी पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग/गटारे असतील तर ते अबाधित ठेवावेत किंवा त्यांची योग्य ती व्यवस्था करावी. कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक पाण्याचे मार्ग बंद करु नये.

16) छतावरील पाणी साठविण्या करिता रेन वाटर हार्वेस्टींग बंधनकारक राहील.

17) सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा बसवून विद्युत वापर कमी करण्याबाबत उपाययोजना करावी.

18) बांधकामाचे परिक्षेत्रात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 नूसार झाडे लावणे आपलेवर कायदेशिर बंधनकारक राहील.

19) प्लास्टीक वापराबाबत शासन व नगर परिषद यांचे कडून वेळोवेळी होणा-या आदेशाचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

20) सांडपाण्याची पाईप लाईन नगर परिषदेच्या प्रस्तावित भूयारी गटार योजनेच्या पाईप लाईनला जोडणे बाबतची तजविज करणे बंधनकारक असून याबाबत नगर परिषदे कडून वेळोवेळी केल्या जाणा-या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

21) ईमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नगर परिषदेच्या पाणी पूरवठा योजनेची नळ जोडणी घेणे बंधनकारक राहील.अन्यथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

22) बांधकाम करतांना रहदरीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. साहित्य रस्त्यावर असल्यास नगर परिषदेकडे जमीन भाडे भरावे लागेल.

23) पाण्याचा निच-या करिता आपणांस स्वखर्चाने पक्की नाली बांधून व्यवस्था करणे बंधनकारक असेल.

24) बांधकामा मुळे नगर परिषदेच्या नालीचे नुकसान झाल्यास त्याची आपणा कडून भरपाई केल्या जाईल.

25) आपण दाखल केलेले कागदपत्रे, नकाशा खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात यावी.

26) कामाचा दर्जा वापरण्यात येणारा साहित्य बाबत गुणवत्ते आपण स्वखर्चाने तपासणी करावी. याबाबत जबाबदारी आपली राहील.

27) स्थावर संपदा ( विनियम व विकास) अधिनियम, 2016 (महारेरा) कडे आवश्यक असल्यास नोंदणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

28) सदर इमारतीचा वापर सुरु करण्याआधी वापर प्रमाणपत्र घेताना अग्निशमन संयोजने करीता उक्त नियमावलीतील नियम क्र.2.2.8 मधील तरतुदीनुसार उपाय योजना विकसित करणे बंधनकारक राहील.

29) सदर इमारतीमधील महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाय योजना अधिनियम,2009 नुसार आवश्यक ती आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.सदर उपाययोजना करण्याकरीता मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई यांनी नियुक्त केलेल्या अभिकरणा मार्फत करण्यात यावी.सदर अभिकरण यांची यादी ही शासनाच्या WWW.mahafireservices.org.in या संकेतस्थहावर उपलब्ध आहे.

30) यापुर्वी इकडील कार्यालयाचे पत्र CBWWM/B/2019/APL/00275 दिनांक 30.08.2019 रोजी देण्यात आलेली बांधकाम परवानगी ही रद्द समजाण्यात यावी.

मुख्याधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
नगर परिषद, वाशिम

प्रत:-

१) कर विभाग,नगर परिषद,वाशिम यांना माहीती तथा उचित कार्यवाही करीता

२) अग्निशमन विभाग,नगर परिषद,वाशिम यांना माहीती तथा उचित कार्यवाही करीता.